पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
गक्षेका/४/ कावि/१०/२०१७
दिनांक : ३१ /१० /२०१७

प्रति,
मा. - - - - - - - - - - - - - - - - - - - -
सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि. ६/११/२०१७ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक ६/११/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग समिती
## **कार्यपत्रिका क्रमांक ४**

दिनांक: ६/११/२०१७ वेळ: दुपारी २.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक ६/११/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दि. ०३/१० /२०१७ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ३ ) कायम करणे.

विषय क्रमांक १) मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार पिंपरी येथील प्रभाग क्रमांक २१ मधील अयप्पा मंदिरा जवळील संडास ब्लॉक असुन वापरास योग्य नसुन सदर ठिकाणी बहुतांशी सिंधी समाज वास्तव्यास असुन त्यांचे स्वत:चे घरात शौचालय आहे, सदर संडास ब्लॉकचा वापर रहदारी वाले वापरत असल्यामुळे दुर्गंधी पसरुन रोगराई वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणाच्या वास्तव्यास असणा-या नागरिकांच्या तक्रारी वरुन सदर संडास ब्लॉक पाडण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील पी.सी.एम.सी.कॉलनी जवळ असलेले मुतारी व संडास ब्लॉक हे वापरण्यास योग्य नाहीत, तसेच जवळ परिसरात इंडस्ट्रीज एरिया असल्यामुळे निवासी मोजकीच आहेत व त्यांचे स्वत:चे शौचालय असल्यामुळे त्यांना त्याचा वापर होत नसुन, सदर ठिकाणी धुम्रपान तसेच मद्यपी लोकांचा वापर जास्त होतो, त्यामुळे सदर ठिकाणी अस्वच्छता वाढली असुन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे, तरी सदर संडास ब्लॉक व मुतारी पाडण्याच्या ठरावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३) मौजे थेरगाव येथील रोजवुड हॉटेल ते थेरगाव गावठाण या २४.० मी रस्त्यापासुन उत्तरेकडील स.नं.२७ पासुन १२.० मी रस्ता नव्याने प्रस्तावित करुन सदर रस्ता आरक्षण क्र.६२७ पैकी प्राथमिक शाळा या आरक्षणास लागुन ३४.५० मी रस्ता ते स.नं.२६,२७,२८ व २९ या आरक्षणातील १२ मी रस्त्यापर्यंत नव्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत घोषित करणेबाबत मा. "ब" प्रभाग समितीने वरील संदर्भिय ठरावान्वये यापुर्वी मान्यता दिलेली आहे. सदरचे रस्ते घोषित करणेकामी मा.आयुक्त यांनी दि.२५/०४/२०१७ चे प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे, त्याअनुषंगाने सदर मौजे थेरगाव येथील रोजवुड हॉटेल ते थेरगाव गावठाण या २४.० मी रस्त्यापासुन उत्तरेकडील स.नं.२७ पासुन १२.० मी रस्ता नव्याने प्रस्तावित करुन सदर रस्ता आरक्षण क्र.६२७ पैकी प्राथमिक शाळा या आरक्षणास लागुन ३४.५० मी रस्ता ते स.नं.२६,२७,२८ व २९ या आरक्षणातील १२.० मी रस्त्यापर्यंत नव्याने महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत घोषित करणेकामी नागरीकांच्या सुचना व हरकती मागविणेकामी दैनिक पुढारी, दैनिक सामना, दै.नवभारत, जाहिरात क्र.५७० यामध्ये दि.२६/५/२०१७ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर नोटीशीच्या अनुषंगाने ३० दिवसांचे विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही.
सदरचे रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अन्वये अंतिम घोषित करणेकामी सदर प्रस्तावास मा.ग प्रभाग समितीची अंतिम मंजुरी आवश्यक आहे. तरी प्रस्तुत रस्ते अंतिम घोषित करुन कायम करणेसाठी मा.ग प्रभाग समितीची मान्यता मिळणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ४) मा.अर्चना बारणे,मा.निलेश बारणे,मा.सचिन भोसले,मा.मनिषा पवार,मा.झामाताई बारणे, मा.माया बारणे व मा.कैलास बारणे यांनी दिलेल्या पत्रानुसार, प्रभागातील औंध रावेत बी आर टी मार्गावरील सबवे कावेरीनगरकडे जाणा-या रस्त्यात ज्या शेतक-यांची जमीन गेली आहे.
सदर सबवेचे नाव **“कै.ह.भ.प.नारायण लक्ष्मण पवार”** असे नामकरण करण्यात यावे. सदर शेतक-यांचे नाव देऊन त्या शेतक-यांना योग्य तो न्याय देणेबाबत विचार करणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव -३३
गक्षेका /४/ कावि/ १० /२०१७
दिनांक : ३१/१०/२०१७